

'तथापि'चा


# जिव्हाळा

## दुष्काळ पाण्याचा, नियोजनाचा आणि इच्छाशक्तीचा...

प्रिय साथी,

अवघ्या महाराष्ट्रात वैषाख वणवा पेटला आहे आणि जनावरांनाच काय माणसांनाही प्यायला पाणी नाही अशी परिस्थिती सगळीकडे निर्माण झाली आहे. विदर्भ, मराठवाडा या नेहमीच दुष्काळासाठी प्रसिद्ध(?) असलेल्या विभागांसोबतच पाण्याचा प्रदेश म्हणल्या गेलेल्या प. महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यात पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. पुरेसा पाऊस पडूनही उन्हाळ्याचे चार-पाच महिने पाण्यासाठी दाही दिशा तुडविण्याची वेळ स्थानिक जनतेवर येते. नळ योजना (जिथे असतात तेथे), हातपंप, ओढे आटतात. कुठे तरी खबदाडात एखादा ओहोळ शोधत पाच-पाच किलोमिटर निव्वळ पिण्याच्या पाण्यासाठी डोक्यावर हांडे-कळश्या घेऊन तुडवायची वेळ घराघरातील बाया-लेकरांवर येते. प्रगत गणल्या जाणाऱ्या महाराष्ट्रासाठी ही केवळ लज्जास्पद गोष्ट आहे हे जनतेचे लोकशाहीतील राजे म्हणवणाऱ्या पुढारी लोकांच्या ध्यानातच येत नाही याला काय म्हणावं. बरं कमी जास्त प्रमाणात ही दरवर्षीची परिस्थिती आहे तरी आम्हाला जमीनींच्या खरेदी विक्रीतून वेळ कसा मिळत नाही हे एक कोडंच आहे. त्यावर कडी म्हणून की काय ज्या भागात ज्या कारणासाठी आपल्या पूर्वजांनी राजकीय दौरे काढले त्याच भागात त्याच कारणासाठी त्यांचे वंशज दौऱ्याचा फार्स करतात ही तर कमालच म्हणावी लागेल. लोकांची बोंबाबोंब माध्यमांनी दिवसरात्र ऐकवायला सुरुवात केल्यानंतर झोपमोड झालेल्या सरकारातील मंडळी एकमेकांवर श्वेत चिखलफेक करण्यात गुंततात आणि मूळ मुद्द्याला बगल देऊन पावसाळ्यापर्यंत कसा तरी काळ लोटण्याचं धोरण स्वीकारतात तेंव्हा इस रात की सुबह नही असंच म्हणण्याची पाळी आम जनतेवर येणार हे उघड आहे...

**आपली, तथापि टीम**




संदिप अध्वर्यू - Outlookindia.com

## अंतरंग

**मागोवा**

बदलता काळ व आंतरजातीय-धर्मीय विवाहांची आवश्यकता- डॉ. मेघा पानसरे २

**पारगावच्या पारावरुन**

बिन पाण्याची.... गावं ५

**शरीर साक्षरता**

लघवीवरील ताबा जाणे (युरीनरी इनकॉन्टिनन्स) ८

**माहितीच्या जगात**

मविपचा पचन संस्थेतील मीत्र जीवाणू पोस्टर संच ११

मा
गो
वा

# बदलता काळ आणि आंतरजातीय-धर्मीय विवाहाची गरज

## डॉ. मेघा पानसरे, भारतीय महिला फेडरेशन, कोल्हापूर

आंतर जातीय किंवा आंतर धर्मीय लग्नांना आजही फार मोठ्या प्रमाणावर विरोध होत आहे. त्यातूनच देशभर विविध ठिकाणी घराण्याच्या इज्जतीच्या नावाखाली अनेक मुला-मुलींचे खून केले गेले आहेत आणि केले जात आहेत. या लेखात आम्ही कोल्हापूरच्या भारतीय महिला फेडरेशनने आंतरजातीय/धर्मीय विवाहांना समर्थन देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत त्या प्रयत्नांची ओळख करून देण्याचा प्रयत्न करत आहोत. वाचकांपैकी कुणाला यासंदर्भात आपले अनुभव लिहून पाठवायचे असल्यास जरूर पाठवा.

भारतीय महिला फेडरेशन, अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि श्रमिक प्रतिष्ठान यांनी संयुक्तपणे कोल्हापुर येथे २००५ मध्ये आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह सहाय्य केंद्राची स्थापना केली. माजी न्यायाधीश पी. बी. सावंत आणि कोल्हापूरवासीयांच्या उपस्थितित दोन अंतरजातीय विवाह संपन्न झाले आणि अशा तऱ्हेने केंद्राचे उद्घाटन झाले.

या केंद्राची सुरुवातच मुळी एका आंतरधर्मीय लग्नाच्या प्रकरणाने झाली. मुस्लिम मुलगा आणि हिंदू ब्राह्मण मुलगी या सज्ञान जोडप्याला स्वतःच्या इच्छेने लग्न करण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी भारीतय महिला फेडरेशनच्या महिला समस्या निवारण केंद्राने पुढाकार घेतला अणि त्या अनुभवातूनच या केंद्राची गरज भासली. त्या जोडप्याला मानसिक आधारासोबतच कायदेशीर सल्ला दिला गेला. लग्नानंतर झालेला जंगी स्वागत सोहळा पाहून अशाच परिस्थितीत असलेली अनेक जोडपी केंद्राकडे आली. त्यांनाही वरीलप्रमाणे आधार, मार्गदर्शनदेऊन जाति आधारीत व खर्चिक लग्न पध्दतीला फाटा देऊन एक नवीन पायंडा केंद्राने पाडला. पुढे ओघात जोतीबा आणि सावित्रीबाई फुले निर्मित सत्यशोधक विवाह पध्दतीचाही केंद्राने आपल्या कार्यात अंगिकार केला.

केंद्राने गेल्या ५ वर्षात ४५ विवाह लावले तर १०० हून अधिक व्यक्ति, जोडपी, कुटुंबांचे समुपदेशन केले. फक्त कोल्हापूरातूनच नाही तर बीड, नगर, पुणे इ. जिल्हयांतून तसेच समाजातील सर्व स्तरांतून जोडपी आली. त्यात एका अमेरिकेत स्थाईक झालेल्या व्यक्तीपासून ते सैन्य अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक, कामगार अशा विविध पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा समावेश होता.

### आंतरजातीय-धर्मीय लग्नांचे कायद्यातील स्थान :

हे दोन्ही विवाह भारतात कायदेशीर आहेत. त्यासाठी विशेष विवाह कायदा १९५४ व हिंदू धर्मातंर्गत असलेले लग्न हिंदू विवाह कायदा १९५५ अंतर्गत वैध ठरतात.

एकूण आकडेवारी पाहता खरं तर वरचे वर भारतात आंतरजातीय-धर्मीय विवाहांची संख्या वाढतच (२००८ते ०९-४७५०) आहे. महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशाचा वाटा यात खूप मोठा (१०००) आहे. शिवाय महाराष्ट्रात या विवाहांची संख्या २०१० (२२१४) मध्ये दुप्पट होण्याचा अंदाज आहे. आंतरजातीय आणि आंतर-धर्मीय विवाहांना होणारा विरोध कितीही टोकाचा दिसत असला तरी शहरी भागांबरोबर ग्रामीण भागात आणि दलित जातींमध्येही अशा विवाहांची संख्या वाढती आहे हे एक आशादायी चित्र आहे. (सुबोध धिडीयाल व स्वाती माथुर /TNN)

भारतातील समाजमनात खोलवर रूजलेल्या धर्म व जातीच्या अस्मितेपायी अशा जाती व धर्मबाहेरील विवाहांना समाज आणि विशेषतः त्या त्या जातीतील लोक अजिबात मान्यता देत नाहीत. ही मानसिकता केवळ ग्रामीणच नव्हे तर शहरी भागातही आढळते आहे. यातूनच असा वेगळा विचार करणाऱ्या जोडप्यांना नातेवाईकांकडून नकारापासून ते विविध प्रकारचा छळ, बहिष्कार, मारहाण यांना तोंड द्यावे लागते.

अशा नकारात्मक वातावरणामुळे 'पळून जाऊन' लग्न करणे भाग पडते तेव्हाही मुलीकडचे, मुलीला पळवून नेल्याची, तिच्यावर बलात्कार झाल्याची खोटी तक्रार पोलिसात करतात. अशी असहाय्य जोडपी काही वेळेस आत्महत्या करतात. तर काही वेळा घराण्याच्या इभ्रतीच्या नावाखाली नातेवाईकांकडूनच अशा जोडप्यांच्या हत्याही केली जातात.

अशा भयानक वातावरणातही महाराष्ट्रात काही व्यक्ती, संस्था, संघटना आहेत ज्या अशा जोडप्यांना आर्थिक, मानसिक आधार देण्याचं काम करत आहेत. काही पालक ही आहेत जे आंतर-जातीय-धर्मीय लग्नाच्या बाजूने असतात.

खरं तर भारतासारख्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रात आजही लोकांच्या मनात घट्ट बसलेली पितृसत्ताक व जाती-आधारित मानसिकता कधीकधी पोलिसांसारख्या निरपेक्षपणे काम करणं अपेक्षित असेल्या सरकारी यंत्रणेवरही दबाव आणते. केंद्र सरकार अशा विवाहांमधे सर्वसाधारणतः ढवळाढवळ करीत नाही व न्यायालयही अशा विवाहांना संरक्षणच पुरविते, मात्र कोर्टाबाहेरच्या सुरक्षिततेची हमी कोण देणार?

## ठरवून लग्नाची परंपरा :

अशा सगळया परिस्थितीत तंत्रज्ञानामुळे अत्याधुनिक वगैरे होत चाललेली तरूण पिढी लग्न करताना मात्र परंपरागत पदधतीने, आईवडिलांनी ठरवून दिलेल्या जोडीदाराशीच लग्न करणे पसंत करताना दिसते. यामागे विविध कारणे आहेत. यातील पहिले म्हणजे स्वजातीय विवाह (endogamy) हे जातिव्यवस्थेचे मूळ मनात खोलवर रूजलेले आहे. दुसरे कारण म्हणजे जागतिकिकरणाच्या वावटळीत सापडलेल्या लोकांना आपली जात-समाज ही मूळं तग धरून राहण्यासाठी महत्त्वाची वाटतात. तिसरे म्हणजे पाश्चात्य जगात, जेथे मुले मुली स्वतःच जोडीदार निवडतात, तेथे घटस्फोटांची संख्या वाढताना दिसते आहे. यात तथ्य दिसत असले तरी, भारतात घटस्फोट घेणाऱ्या जोडप्यांमधील बहुतांश हे, पारंपरिक जाती-आधारित विवाहच आहेत. खरं तर लग्न टिकणं हे धर्म किंवा जातीवर अवलंबून नसतं तर दोघांमधील प्रेम, समजूदारपणा, परस्पर विश्वास यावर अवलंबून असतं.

> भारतात अगदी इ.स. पूर्व ६व्या शतकापासून बौध्द धर्म, महानुभाव, भक्ती पंथ, वारकरी संप्रदाय, बसवेश्वर, रोहीदास इ. नी जातिव्यवस्थेचे खंडन केले आहे.
> महात्मा जोतिबा व सावित्रीबाई फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने सत्यशोधक विवाहांची कल्पना मांडली. यामध्ये पारंपारिक वैदिक लग्न पध्दती व ब्राह्मणाचे वर्चस्व यातून समाजाला मुक्त करण्याचा प्रयत्न आहे.
> कोल्हापूर मध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी अशा वेगळ्या विवाहांसाठी कायदा केला. अशा विवाहांना प्रतिष्ठा देणाऱ्या विठ्ठलभाई पटेलांनी मांडलेल्या बिलाला टिळकांनी विरोध केला तर रविंद्रनाथ टागोर इ. नी सहमती दर्शविली.

## आधुनिक भारतातील विवाह संस्था व लग्नसोहळयाचा व्यापार :

परंपरेने ठरवून लग्न करण्याचे प्रमाण जास्त असले तरी विवाह सोहळयाच्या पध्दतीत खूप फरक पडला आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना जागतिकीकरण व बाजार व्यवस्थेने काबीज केले आहे. त्यातूनच लग्न हे कुटुंबाचे आर्थिक सामाजिक स्थान सिध्द करण्यासाठीचे साधन बनले आहे. एका लग्नाचा खर्च कमीत कमी ३ ते ५ लाखाच्या दरम्यान जातो. यासाठी पारंपरिक लग्न पध्दतीमध्ये मेहंदी नाईट, संगीत इ. गोष्टींना घुसविण्यात आले आहे. अर्थातच हा जास्तीचा खर्चही पूर्वापार पध्दतीप्रमाणे मुलीकडच्यांनी उचलणे अपेक्षित आहे. तसेच हुंडा पध्दत तर अजूनही कायम आहे. मुलगा जितका अधिक शिकलेला तितका हुंडा जास्त. यातूनच हुंडाबळींचीही संख्या ही वाढते आहे. हुंडा घेणे-देणे कायदयाने गुन्हा असूनही २००५ साली राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाने प्रत्येक ७७ मिनिटाला एक म्हणजे वर्षभरात ७००० हुंडाबळींची नोंद केली. अर्थात अनेक हुंडाबळी हे अपघाताच्या नावाखाली लपविले जातात. या पार्श्वभूमीवर या सर्व दुष्टचक्रातून आजच्या तरूणाईने बाहेर पडण्यासाठी स्वतःच्या आयुष्याचा जोडीदार स्वतः निवडण्याचा अधिकार बजावणे किती गरजेचे आहे हे लक्षात येते.

## जागतिक विश्वात आंतरजातीय विवाह :

जागतिकिकरणाने, आधुनिक तंत्रज्ञानाने मानवी विकासाचा सर्वोच्च टप्पा गाठला असं वाटत असलं व वैयक्तिक ऐशोरामासाठीची एकापेक्षा एक साधने उपलब्ध करून दिली असली तरी सर्व समाजातील गरीब-श्रीमंतीची आर्थिक दरी मिटू शकलेली

नाही. भारताच्या बाबतीत आधुनिक तंत्रज्ञान येथील लोकांना जात, धर्म यांच्या बेड्यांमधून मुक्त करू शकलेले नाही. उलट येथील जनता आर्थिक, शैक्षणिक व इतर सर्वच बाबतीत अधिकाधिकरित्या दोन विरूध्द ध्रुवांमध्ये विभागली जात आहे आणि ही दरी अधिकच रुंद होत आहे. त्यातून नविन सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत.

अर्थात जागतिकिकरणाची देणगी असलेली उपभोगवाद, चंगळवाद ही मूल्ये मात्र समाजमनात, सर्वच स्तरांत खोलवर झिरपत जात आहेत व त्यातूनच लग्नाकडे कुटुंबाची सुबत्ता वाढविण्याचे साधन म्हणून तर मुलीकंडे लग्नाच्या बाजारातील क्रयवस्तू म्हणून पाहिले जाते आहे. आणि लग्न सोहळा हा एक मोठा दिखावूपणाचा उद्योग बनत आहे.

मुलींसाठी जोडीदार निवडीचं स्वातत्र्य हा त्यांचा मानवी अधिकार आहे. भारतात अजून याची अशी मांडणी झाली नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवधिकाराचे पुरस्कार करणाऱ्या सीडॉ करार व इतरांनी तर भारतात राज्यघटनेने काही प्रमाणात याचा विचार केला आहे.

या सर्व परिस्थितीत आता जातीव्यवस्थेविरूध्द एकत्र येऊन लढा अधिक तीव्र करण्याची वेळ आली आहे. आमचे आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह सहाय्य केंद्र या लग्नाच्या बाजारपेठेला एक पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. विशेष विवाह कायदा १९५४ अंतर्गत नोंदणी होणारा, साधा व शून्य खर्च असणारा आणि कर्मकांडाविना केला जाणारा विवाह हा आजच्या तरूण पिढीपुढचा खरा पर्याय आहे. स्वतःहून आंतरजातीय/धर्मीय लग्न करू इच्छिणारे युवक युवती तयार व्हावेत, अशी आमची आशा आहे.

या केंद्राकडे खालील परिस्थितींमध्ये युवा वर्ग येतो :

लग्नविषयी अंतिम निर्णय घेण्याच्या परिस्थितीत असताना.

लग्न करण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी गुपचूप घरून निघून आले आहेत व नोंदणीकृत लग्न करण्याची इच्छा असताना.

नुकतेच लग्न झाले आहे आणि नैतिक आधार व संरक्षणाची गरज असताना.

लग्न आधीच झाले आहे मात्र कुटूंबिय व समाजाकडून त्रास होतो आहे.

**पान क्र १२ वर..**

# आम्हीही आंतरजातीय विवाह केला.

ॲड. सुनीता धनवडे, सांगोला

आम्हीही आंतरजातीय विवाह केला. त्यासोबतच मागची बारा वर्ष जात सोडण्याचा प्रयत्नही करत आहोत. आमच्या या निर्णयाचा दोघांच्या कुटुंबांना खूप त्रास झाला. माझ्या सासूबाईंनी ज्या घरात आपल्या आयुष्याची वीस वर्ष घालवली ते घर आमच्यासाठी त्यांना सोडावं लागलं. पण असं जरी असलं तरी आमच्या दोघांचं जीवन खूप सुंदर आहे. सर्व पातळीवर समानता आणण्याचा प्रयत्न आमच्या कुटुंबात आम्ही करतो. आमच्या आयुष्याच्या सर्व जडणघडणीमध्ये सासूबाईंचा खूप मोठा वाटा आहे. शिवाय मला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक अशा सर्व क्षेत्रांत पुढे जाण्यासाठी माझ्या जोडीदाराचाही सिंहाचा वाटा आहे.

आंतरजातीय विवाह हा समाजाच्या नजरेत गुन्हा आहे. तो जे करतात त्यांना त्याचे परिणाम सोसावे लागतातच. पालकांची परवानगी घ्यायची म्हणलं तर स्वतःचा जीवही गमवावा लागतोय ही आजची परिस्थिती आहे. एकविसाव्या शतकातही असे आपल्याच मुलांना संपविण्यास तयार झालेले आजचे काही पालक असणं हे विदारक चित्र आहे. मला आमच्या स्वतःच्या अनुभवातून पालकांना सांगावेसे वाटते की जन्म दिला म्हणून आमच्यावर तुम्ही मालकी सिद्ध करू नका. नको असलेल्या परंपरा, चालीरितीनी आमचे जीवन विदारक करण्यापेक्षा तुमच्याच संस्कारातून मिळालेलं मौलिक शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभव यांचा विचार करून आम्हाला आमच्या आयुष्याचे निर्णय घेण्याची संधी द्या व तसा वाव द्या. मग बघा तुमची मुलं तुमच्याही पुढे जाऊन मोठी झालेली तुम्हाला दिसतील. आमच्या पंखात एवढे बळ द्या की आम्ही आकाशाला गवसणी घालू शकू. जीवनातील प्रत्येक प्रसंगांना सामोरे जाण्याची ताकद आमच्यामध्ये येईल.

आम्ही दोघे या निमित्ताने सर्व पालकांना एवढेच सांगू इच्छितो की एरवी लहानपणापासून आमच्या जीवनातील प्रत्येक प्रसंगात आपण आमच्या सोबत असता मग आयुष्याचा हा महत्त्वाचा निर्णय आम्ही घेताना किमान समजून तरी घ्या. कोण काय म्हणेल यापेक्षा आमच्या मनाचा विचार करा. दिलेला जन्म अविचाराने नाकारून आम्हाला संपविण्यापेक्षा किंवा बहिष्कृत करण्यापेक्षा संवादाने हे जीवन सुखकर बनविण्याचा प्रयत्न आपण करू शकतो असं आम्हा दोघांना वाटतं.

# बिन पाण्याची.... गावं

पारगावच्या पारावरून बाबींचा समद्यास्नी नमस्कार. ऊनाच्या ह्या कारात पुढचा मान ऊचलून उलटा नमस्कार घालीलच ह्यची काय खात्री न्हाई बगा. तुमाला सांगायचं म्हंजी आवंदा आमी सरकारला अर्ज केलाया आमच्या गावाला टँकर मुक्त गावाचं बक्षिस देन्यासाठी. पार राहूल गांदीपर्यंत आर्ज टाकलाय. एवड्या उन्हाळ्यातबी आमचं गाव टँकरमुक्त झालंय बगा. निसतं टँकरमुक्त न्हाई तर पानीमुक्तच गाव हाय आमचं. पावसाळा सोडला तर गावात पानीच बगायला मिळंत न्हाई. आन त्यच्यात पावसानं जर आमाला सोडला तर काय इचारायलाच नगं. पानी पानी करून मरायची पाळी आलीया पर सरकाराला काय जाग न्हाई. कमळी मंजूळीच्या बी त्याच गप्पा चालल्याती वाटतं...

क. मंजुळे, ए मंजुळे, हाईस का गं घरात?

मं. हाय की. चिमित्कारच झाला म्हनायचा आज. वरची आळी चक खाली. कशी काय वाट वाकडी झाली आज गरिबाकडं.

क. मंजुळे रोज तुज्या दारापुढ्नं एक-एक घंटा जातोय. गावभरच्या गप्पा मारतीस तू. तरी म्हनतीस व्हय वाट वाकडी केली म्हनून.

मं. आगं माझ्या दारापुडं म्हनजे तुमच्या जनीच्या परसात. तुमच्या अँव्हेन्याला बातमी लागंल म्हनून आमच्या घरात कवा येतीस गं? अन काय गं, मी गावभरच्या गप्पा करते अन तुमी किर्तन ऐकायलाच येताव जसं काय..

क. मरकरी केली गं.. अँव्हेन्याचं म्हनशील तर आत्यानीच पाठवलंय तुज्या मैतरनीकडून एक बिंदगीभर तरी पानी घेऊन ये म्हनून. पावना घरात ईऊन बसलाय आन प्यायला पानी न्हाई.

मं. बरं झालं आत्ता आलीस. थोडं आदुगर आली आसतीस तर गावले नसते बग.

क. का गं? कुटं मिटिंग गिटिंग मदी बिजी हुतीस का?

मं. व्हय मिटिंगच हुती की. बापु कुलकर्ण्याच्या मळ्यात, पडक्यातल्या हिरीवर. चांगला दोन घंटं घसा कोरडा केला तवा घागर वली झाली बग. ती बी एकच गावली कशीतरी. समद्याचं झाल्यावर आमच्या लोकायनी पानी भरायचं ना.

क. पान्याला गेल्तीस व्हय. बरी एक घागर तरी मिळाली. आमी एकाच हांड्यात सा जनं घालवायलाव तीन दिस झालं. त्यच्यात पोरं आसली अवचिंद हाईत बग. निसती सांड लवंड करतेत. सकाळी आख्खा तांब्या लवंडला गं परशानं. एक ठिऊन दिली मुस्काडात. बसला तासभर रडंत. ह्या पान्यामुळं भलंबुरं बी काय सुचंत न्हाय बग. उगाच पोराला मार बसला.

मं. पोराला कशाला मारायचं गं.. एका तांब्याचीच तर बात हुती. तेवडंच पानी डोळ्यातून गाळलं आसंल त्यनं.

क. न्हाई तर काय? माय ह्यच्या त्यच्या पाया पडून पानी आनायलीया अन हे सांडतेत आपलं. बापाला तर कशाचीच फिकीर न्हाई बग. निसतं पांढरे फॅक कपडे घालायचे आन फिरायचं सरपंचाच्या मागं मागं. परवा त्यो राहूल गांधी येनार म्हनून ह्यंचीच लगबग चाललेली. शर्ट धून दे, नीळ घाल, इस्त्री कर, तुला नीट नीळ घालताच येत न्हाई. अशी भूनभून केली बग. जसं काय राहूल गांधी ह्यंचा शर्ट किती फॅक्कय हेच बगायला येनार हुता. ह्या लोकायला दौरे काय महाग हाईती व्हय. मागं बाप आला, मग माय आली आन आता पोरगं. हामी जिथं होतो तिथं राह्यलाव ना पानी पानी करंत. काय करावं तूच सांग. आता जावायचा भाऊ ईऊन बसलाय घरात आन प्यायला सुदिक पानी न्हाई. तवा आत्यानं तुज्याकडं पाठवलं.

मं. जा बाई घिऊन एक बिंदगी. पान्यानं लईच आवघड केली बग परिस्थिती. तुला म्हादबाच्या म्हाताऱ्याची गोष्ट कळाली का?


क. काय ती?

मं. आगं त्यच्या घरचा रांजण नेमी खोल गेलेला आसतोय. म्हादबाला काय पानी भरायला येळंच होत न्हाई अन ह्याला आजकाल चारचारदा जावं लागतंय पांदीला.

क. मग?

मं. मग काय, त्यो रोज टंबरेलभर पानी घेत होता केरबा तात्याच्या रांजनातून. नजर चुकवून. केरबाची म्हतारी, आपली नानी गं, तुला तर म्हईतच हाय कशी हाय ती. बगीतली बगीतली अन लागली वरडायला.

क. एका टंबरेलानं काय हिचं घर वर यायचं ऱ्हायलंय का काय?
मं. आगं ते सोड. टंबरेलभर पान्याचं भांडान पार दोन पिढ्या मागं गेलं. ह्यो म्हनला तुजा सासरा माज्या उकंड्याच्या जागेत घुसला तवा तुला दिसलं न्हाई का, त्यचं बोल आदी. तर त्यच्यावर नानी म्हनतीया माज्या नंदंला का नाही म्हनला तुजा भाऊ?
क. तिची ननंद अन ह्यचा भाऊ? ही काय भानगड हाय आता?
मं. ती जाऊ दे. त्यो भाऊ म्हननारा सर्गात गेला दहा वर्स झाली आणि हिच्या नंदंच्या गौऱ्या बी पुडं गेल्यात कवाच. पर तवाची गोष्ट हे काय इसरायला तयार न्हाईत. म्हनून टंबरेलभर पानी बी न्हाई. आशी सगळी मजा हाय.
क. कुनाचं काय तर कुनाचं काय. आरगावच्या ज्ञानू पाटलाच्या पोराच्या लग्नाची कथा ऐकशील तर येडीच हुशील.
मं. त्यचं काय झालं आता?
क. आगं ह्या साली लग्नाचे मुहुर्त जास्त न्हाईत म्हनून घाईघाईत पाटलानं पोराचं लग्न काढलं. बक्कळ हुंडा घेतला आन पोरीकडच्यांला वऱ्हाड आनायला सांगितलं सोताच्या गावात.
मं. मग?
क. मग काय? एवढ्या लोकायला पानी कमी लागतंय का?
मं. त्यला काय कमी हाय. चांगली पाच धा टँकरं उभी करंल की दारात.
क. आगं टँकर आसतील तर उभी करंल की. समदे टँकर त्यो मंत्री का संत्री येनार होता ना कसल्यातरी उद्घाटनासाठी, त्यच्या डोळ्यात फुपाटा जाऊ ने म्हनून आख्ख्या रस्त्यावर पानी शिपडायच्या कामाला लागलेले. ह्यच्या लग्नाला कुटला टँकर येनार गं. लग्नच कॅन्सल केलं झालं. असल्या शेलक्या शिव्या देत होता म्हनं मंत्र्याला पाटील, आमचे हेच सांगत व्हते.
मं. त्यो मंत्री बी भारी अन ह्यो पाटील बी भारी. मोठ्या लोकायच्या मोठ्या गोष्टी न काय. त्या मंत्र्याचं जाऊ दे. तुजा त्यो जावायचा भाऊ पान्यासाठी तडफडत आसंल घरी. पर मला सांग मदीच ह्यो जावायचा भाऊ कसा परकटला म्हनायचा?
क. आग ते म्हनतेत ना घरचं झालं थोडं आन इवायानं धाडलं घोडं. आमच्या इवायानं तेच केलंय. फकस्त घोड्याच्या जागी बैलं लावून दिलेत बग पोराबरूबर.
मं. बैलं? ते कशाला? वैशाखातच नांगर धरताव का काय?
क. आगं इवायाच्या गावाला लोकायलाच प्यायला पानी न्हाई तर जनावरांना काय पाजनारेत. समदं गाव टँकरची वाट बगत बसतंय सकाळधरनं. भर उनात कधी तरी टँकर येनार त्यच्यावर गाव तुटून पडनार. वरून डोकं भाजतंय आणि खाली पाय. तशात पानी भरायचंय. बाप्या असंल तर पानी मिळतंय बाई मानसाला तर खाली हातच यावं लागतंय म्हनं. जनावरायचे खायचे बी लई वांदे झालेत सांगत



हुता पावना. मागच्या वर्षी जवारी हातची गेली, कडबा बी लई पडला न्हाई बग. एक पेंडी पंचवीसला चाललीया. कसं गं पोसनार जनावरं. म्हनून त्यंनी बैलं लावून दिली इकडं.

मं. इकडची परिस्थिती कुटं येगळी हाय का म्हनावं. उघडं नागड्याजवळ गेलं म्हनल्यासारखंच झालं की.

क. पन सांगनार कुनाला. आपली पोरीकडची बाजू. शिवाय पेरनीगिरनीला बैलं देतेत न्हवं. न्हाई कसं म्हननार.

मं. ह्यंचं तरी बरं हाय. माझ्या माहेरला तर लई वाईट परिस्थिती हाय बग. डोंगरदऱ्याचं गाव तिथं कसला टँकर अन कसंल बोरींग. खायप्यायचे वांदे म्हनून घरदार सोडून परागंदा व्हायची येळ आलीया. भाऊ न वैनीबी ते पार तिकडं पुन्याकडं गेलेत बग मोलमजुरीच्या मागं बंधाऱ्याच्या कामावर. जमीनजुमला, गुरंढोरं न्हाई तेच बरं हाय म्हनायची पाळी आलीया माय. जमीन जुमला असनाऱ्याला ना धड गावात ऱ्हाता येतंय ना धड गाव सोडता येतंय.

क. व्हय गं माय. परवा आमचा शीवराम आला होता न्हवं पुन्यावून. त्यो सांगत हुता पुन्यात बी पान्याचं लई हाल हायती म्हनून.

मं. तिथं काय झालं आता. पुने तिथे काय उने म्हनत्यात न्हवं.

क. खरंच हाय म्हना ते बी. पर त्यांना बी पान्याचा लई तरास हाय माय. पयलं चोवीस तास पानी यायचं म्हनं आता दिवसातून चार पाच तासच आसतंया.

मं. दिसातून चार पाच तास? आगं इतं चार पाच दिसातून एखांदा तास आलं तर मी जीव ववाळून टाकंल गं त्या गरामपंचायतीवर.

क. न्हाईतर काय. पुन्यामुंबईची येगळीच तऱ्हा हाय माय. त्यांची कशाला या सगळ्या जगाचीच एगळी तऱ्हा हाय. काल तालुक्याला गेल्ते तर स्टँडमदी लोकायला प्यायालासुदीक पानी न्हाई, पन हाटेलात मातूर पंधरापंधरा रुपयाला बाटल्या इकतेत. इतं एवडा दुष्काळ हाय आन ह्या कंपन्याईला कुठून पानी मिळंत आसंल काय ठाव? लोकं निसते स्किमवर स्किमा बांधायलेत म्हनं तिकडं पुन्याला. त्याला काय पानी लागंत न्हाई का काय? लातरात तर म्हनं आता लाईटी परमानं मिटरच लावनारेत पान्याला.

मं. लावा म्हनाव. पान्याला मिटर लावा, रस्त्याला टोल लावा आमच्या सगळ्या जिंदगानीच्याच पावत्या फाडा. आरं पर पैलं जगू तर द्या. ज्यच्यासाठी पैका मागताव ती गोष्ट तरी देनाराव का न्हाई म्हनावं. का आंस बारा महिने तेरा काळ लोकायला फकस्त तरसतच ठेवनाराव?

क. बरी आठवन झाली. तिकडं आमचा पावना बी तरसत आसंल बग पान्यासाठी. जाते गं माय. आमचे राहूल गांदी बी आलं आसतील दौऱ्यावरून दमून भागून..

---

## निषेध निषेध निषेध निषेध निषेध निषेध निषेध निषेध निषेध निषेध निषेध निषेध

२ एप्रिल २०१२ रोजी सातारा शहरात वेश्या व्यवसायातील एका गर्भवती महिलेवर पोलीसी अत्याचाराची घटना घडली. दयानंद ढोमे नावाच्या पोलीस इन्स्पेक्टरने रस्त्याने जाणाऱ्या अनू मोकल नावाच्या या बाईला इतकं मारलं की त्या बाईचा गर्भपात झाला. जेव्हा ही घटना घडली तेव्हा त्या दोघी बस स्टँडसमोरून त्यांच्या दुसऱ्या एका मैत्रिणीसाठी डबा घेऊन जात होत्या. ती गर्भवती आहे हे विनवून सांगूनही त्या पोलीसांना काही फरक पडला नाही. मारहाण करून झाल्यावर त्यांनी या दोघींना अटक केली आणि नियमित वैद्यकीय तपासणीच्या वेळी डॉक्टरांनी सांगीतलेली औषधंही पोलीसांनी तिला घेऊ दिली नाहीत. या दोघीही वेश्या अन्याय मुक्ती परिषदेच्या सदस्य आहेत. त्या दोघींनी परिषदेमार्फत पोलीसांकडे तक्रार दाखल करूनही जिल्हा पोलिस प्रशासनाने चौकशी समिती नियुक्त करण्या व्यतिरिक्त संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध काहीही पावलं उचलली नाहीत.

वेश्या या समाजासाठी कलंक आहेत आणि शिवाय त्यांना आई बनण्याचाही काही अधिकार नाही या शब्दात अनूसारख्या स्त्रियांची संभावना करणाऱ्या या पोलिसांचा आम्ही निषेध करत आहोत आणि या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना कठोर शासन केलं जावं अशी मागणी करत आहोत. वेश्या अन्याय मुक्ती परिषद आणि संग्राम सारख्या संस्था या अन्यायाला वाचा फोडण्याचं काम करत आहेत त्यांच्या प्रयत्नात जिव्हाळा टीम त्यांच्या सोबत आहे.

शरीरसाक्षरता

# लघवीवरील ताबा जाणे (युरीनरी इनकॉन्टिनन्स)

**आपल्या आरोग्याविषयी आणि शरीराविषयी अजूनही अशा अनेक गोष्टी आहेत ज्या आपण मोकळेपणाने कुणाशी बोलू शकत नाही. मासिक पाळी, लैंगिक व प्रजनन संस्थेतील अवयव आणि त्यांच्याशी संबंधित आजारांबद्दल अजूनही एक प्रकारची भीती आणि न बोलण्याची पद्धत रूढ झाली आहे. ही भीती आणि त्याबरोबरीने येणारी हतबलता घालवणे हे जिव्हाळ्याचे कामच आहे. अशाच एका आजाराबद्दल या अंकात आपण माहिती घेणार आहोत. हा आजार म्हणजे लघवीवरील ताबा अंशतः किंवा पूर्ण जाणे. याला इंग्रजीमध्ये युरिनरी इन्कॉन्टिनन्स असं म्हणतात.**

लघवीवरील ताबा जाणे म्हणजे काय?

अनेकदा आपल्याला असा अनुभव आला असेल की खोकला आल्यावर किंवा शिंकल्यावर, जोरात हसल्यावर किंवा जड वस्तू उचलल्यावर देखील थोडीशी शू होते, काही थेंब लघवी बाहेर येते. मूत्राशयावर थोडा जरी ताण आला तरी लघवी काही किंवा मोठ्या प्रमाणात बाहेर येण्याच्या या वृत्तीला लघवीवरील ताबा जाणे असं म्हणतात. बहुतेक जणांना असं वाटतं की हा केवळ म्हातारपणी होणारा आजार आहे. पण हे खरं नाही. चाळिशीच्या आसपास असणाऱ्या स्त्रियांमध्येही हा त्रास मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. मूत्रविकार तज्ज्ञ डॉ. बलदेव सिंग औलख यांच्या मते २५% स्त्रियांमध्ये हा आजार आढळून येतो. वयस्क स्त्रियांप्रमाणेच तरुण स्त्रियांनाही हा त्रास होत असल्याचे आणि त्यामागे विविध कारणं जबाबदार असल्याचं दिसून येतं. (संदर्भ, टाइम्स ऑफ इंडिया, ३/९/२०१०)

ही कारणं कोणती हे पाहण्याआधी मूत्रसंस्थेची रचना कशी असते ते पाहू या.

स्त्रीच्या शरीरात मूत्रमार्ग, योनिमार्ग आणि गुदद्वार या तिन्ही वाटा जवळ जवळ असतात. मूत्राशय आणि गर्भाशय या दोन्ही अवयवांना आधार देणारे काही चिवट स्नायू या अवयवांच्या खालच्या बाजूला असतात. त्यांना पेल्विक फ्लोअर मसल्स, किंवा कमरेच्या तळभिंतीचे स्नायू असे म्हणतात. या स्नायूंमुळे हो दोन्ही अवयव खाली सरकत नाहीत. या स्नायूंना काही इजा झाल्यास किंवा ते कमजोर झाल्यास ते खोकला किंवा तत्सम ताण सहन करू शकत नाहीत.

मूत्राशय आणि मूत्रमार्ग यांची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण असते. मूत्राशयाला जिथे मूत्रमार्ग जोडलेला असतो तिथे दोन्ही बाजूला काही स्नायू असतात जे मूत्रमार्ग उघडू देत नाहीत. जेव्हा लघवी करायची असते तेव्हा ही वाट उघडते, मूत्राशयाचे स्नायू आकुंचन पावतात आणि लघवी बाहेर येते. या स्फिंक्टरला किंवा स्नायूला इजा झाली तरी मूत्र बाहेर येण्याच्या क्रियेवरील ताबा कमी होतो.

लघवीवर ताबा न राहण्याचे काही नेहमी आढळणारे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

स्ट्रेस इन्कॉन्टिनन्स - या प्रकारात मूत्राशयावर दाब पडल्यास लघवी बाहेर येते. उदा. शारीरिक व्यायाम केल्यावर, एखादी जड वस्तू उचलल्यावर, खोकला किंवा शिंक आल्यास, जोरात हसल्यास मूत्राशयावर दाब पडतो आणि लघवीचे काही थेंब बाहेर येतात.


अर्ज इन्कॉन्टिनन्स - या प्रकारात जोरात लघवी लागते आणि कधी कधी लघवीला बसेपर्यंत लघवी होते. यामध्ये मूत्राशयाचे स्नायू आपणहून शिथिल होतात, मूत्रद्वार उघडते आणि त्यामुळे आपल्या नकळत, आपोआपच लघवी होते.

मिक्स्ड इन्कॉन्टिनन्स - या प्रकारात स्ट्रेस आणि अर्ज या दोन्हींची लक्षणं एकत्र असतात.

ओव्हरफ्लो इन्कॉन्टिनन्स - या प्रकारामध्ये मूत्राशय भरल्यावरती लघवी बाहेर येते पण मूत्राशय पूर्ण आकुंचन न पावल्यामुळे सगळी लघवी बाहेर न येता थेंब थेंब येत राहते.

टोटल इन्कॉन्टिनन्स - यामध्ये लघवी सतत बाहेर येत राहते.

**मूत्र संस्थेची रचना**



आपल्याला लघवी जाण्यासंबंधी नक्की काय प्रकारचा त्रास होत आहे हे ठरवण्यासाठी काही लक्षणांचा अभ्यास करणं आवश्यक असतं. त्यासाठी एक प्रश्नावली देत आहोत. आपल्याला यातले काही त्रास होत आहेत का हे तपासा आणि यातील काही लक्षणं जाणवत असल्यास त्याबद्दल जरूर वैद्यकीय सल्ला घ्या.

- **कोणत्या कृती केल्यानंतर लघवी बाहेर येते?** हसणे, खोकणे, शिंकणे किंवा अचानक उठल्यानंतर लघवी होते का? पाण्यात हात घातल्यानंतर किंवा वाहत्या पाण्याचा आवाज ऐकल्यावर लघवीला जायची भावना होते का?
- **थोडीच लघवी बाहेर येते का कपडे खूप ओले होतात?** मूत्राशयावर ताण येत असल्यास थोडीच लघवी बाहेर येते. मात्र अर्ज इनकॉन्टिनन्स या प्रकारात बऱ्याच प्रमाणात लघवी होते.
- **कपडे ओले होऊ नयेत म्हणून तुम्ही पॅड, किंवा कापड वापरता का?** यातून त्रास किती गंभीर आहे ते कळून येते.
- **लघवी करण्याआधीदेखील तुम्हाला लघवीला जाण्याची भावना होते का?** लघवीला जाण्यापूर्वी जोरात शू लागणे हे अर्ज इनकॉन्टिनन्सचे लक्षण आहे. स्ट्रेस या प्रकारात अशी जाणीव होत नाही.
- **जोरात शू लागण्याची जाणीव मूत्राशय पूर्ण भरल्यावरच होते का?** खूप जास्त प्रमाणात पाणी किंवा द्रव पदार्थ घेत असाल किंवा वेळेवर लघवी करायला जात नसाल तर अशी भावना होऊ शकते.
- **तुम्ही एका दिवसात किती वेळा लघवीला जाता? रात्रीत किती वेळा?** बहुतेक जण दिवसभरात ६ वेळा आणि रात्री एखाद्या वेळा लघवीला जातात. मूत्राशय उत्तेजित झाले असल्यास जास्त वेळा लघवीला जाण्याची भावना होऊ शकते.
- **लघवी करून आल्यानंतर मूत्राशय पूर्ण रिकामे झाले आहे अशी भावना होते का?** मूत्रमार्गाला काही जखम किंवा व्रण असल्यास मूत्राशय पूर्ण रिकामे होत नाही. तसंच मूत्राशय उत्तेजित झाले असल्यास सतत लघवी लागल्याची आणि मूत्राशय रिकामे होत नाही अशीही भावना होते.
- **लघवी करताना वेदना होतात का? किंवा आग होते का?** ही मूत्राशयाच्या संसर्गाची लक्षणे असू शकतात.
- **तुम्हाला दर वर्षी एखाद-दोन वेळा मूत्राशयाचा संसर्ग होतो का?** सतत संसर्ग होत असल्यास त्याचे मूत्राशयावर परिणाम होतात आणि त्यातून लघवीसंबंधी समस्या सुरू होऊ शकतात.
- **तुम्हाला कधी लघवी अडकण्याचा, लघवी सुरू होताना त्रास झाला आहे का?** मूत्रमार्गामध्ये अडथळा असल्यास किंवा मूत्राशयाच्या नसांना काही इजा झाल्यास असा त्रास होऊ शकतो.
- **लघवी सुरू झाली की ती थांबत नाही असा काही त्रास तुम्हाला झाला आहे का?** अर्जन्सी इनकॉन्टिनन्स या प्रकारात असा त्रास होऊ शकतो.
- **योनिमार्गामध्ये काही फुगवटा आल्यासारखे वाटत आहे का?** कंबरेच्या पोकळीतील स्नायूबंध कमकुवत झाल्यामुळे कधी कधी मूत्राशय किंवा गुदाशय योनिमार्गामध्ये खाली सरकू शकते. योनिमार्गामध्ये काही तरी आल्याची किंवा खाली सरकल्याची भावना निर्माण होऊ शकते.
- **थोडा वेळ किंवा बराच काळ उभं राहिलं तर कंबरेमध्ये किंवा कंबरेच्या पोकळीमध्ये काही तरी ओढलं गेल्यासारखं किंवा दाब आल्यासारखं वाटतं का?** मूत्राशय खाली सरकल्यामुळे अशी लक्षणं निर्माण होऊ शकतात.
- **तुम्हाला सतत लघवी होत राहते का?** मूत्राशयाच्या स्फिंक्टरला इजा झाली असल्यास किंवा ओव्हरफ्लो इनकॉन्टिनन्स असल्यास त्यामुळे हा त्रास होऊ शकतो.
- **तुम्हाला चेतासंस्थेचे, विशेषतः कंबरेचे आणि पायाचे काही आजार आहेत का?** पाठीला झालेली गंभीर इजा, पक्षाघात, पार्किन्सन्स आजार किंवा मल्टिपल स्क्लेरोसिससारखा आजार झाला असेल तर मूत्राशयाच्या कामामध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो.
- **तुम्हाला मधुमेह आहे का? मधुमेहामुळे मूत्राशयाला जोडलेल्या नसांवर परिणाम होऊ शकतो त्यामुळे मूत्राशयाच्या कामात अडथळा निर्माण होऊ शकतो.**
- **याआधी मूत्राशयाची शस्त्रक्रिया झाली आहे का?** शस्त्रक्रियेच्या व्रणामुळे मूत्रमार्ग बंद होण्यात अडथळा येऊ शकतो.

या लक्षणांच्या आधारावर आपल्याला लघवी जाण्यासंबंधी नक्की काय त्रास आहे हे आपण ओळखू शकतो. पुढच्या अंकामध्ये प्राथमिक अवस्थेमध्ये लघवी जाण्याला कसा आळा घालता येईल ते आपण पाहू, त्यासाठी काही साधे व्यायाम आणि उपचार पद्धतींची माहिती पुढील लेखात.

*संदर्भ - द इनकॉन्टिनन्स सोल्यूशनछ आन्सर्स फॉर विमेन ऑफ ऑल एजेस, अ फायरसाइड बुक, सायमन अँण्ड शूस्टर, न्यू यॉर्क, २००२*

# वट पौर्णिमा

*वटपौर्णिमा हे व्रत देशभरात फार मोठ्या प्रमाणावर साजरं केलं जातं. सत्यवान आणि सावित्रीची कथा पतिव्रता स्त्रीची, आपल्या पतीचे प्राण परत मिळवणाऱ्या आदर्श स्त्रीची कहाणी म्हणून सांगितली जाते. आपल्या पतीच्या आणि लेकरांच्या कल्याणासाठी स्त्रियांनी हे व्रत करावे अशी रीत आहे. पुरुषप्रधान संस्कृती टिकवण्याचे हे व्रत म्हणजे एक प्रभावी साधन आहे. या व्रतामागची कहाणी आणि अर्थ समजून घेतानाच ते करण्यात काही तथ्य आहे का हेही समजून घेऊ या.*

अश्वपती राजाला बरीच वर्षे मूल झालं नाही म्हणून त्याने १८ वर्षं सावित्री देवीची उपासना केली. त्यानंतर देवीने त्याला मुलगी होईल असा वर दिला. खरं तर राजाला १०० पुत्र हवे होते. पण मिळाले आहे त्यात समाधान मानावे असा उपदेश सावित्री देवीने केला. कालांतराने त्याला अतिशय सुस्वरूप आणि बुद्धिमान मुलगी झाली. ती अकरा वर्षाची झाली तरी तिचे लग्न जमले नव्हते. तेव्हा नारदमुनींनी राजाला विचारणा केली आणि राजाने अखेर सावित्रीला आपल्या पसंतीचा वर शोधायला पाठवले. देशोदेशी फिरल्यानंतर सावित्रीने शाल्व देशाच्या राज्य हिरावले गेलेल्या द्युमत्सेन राजाच्या एकुलत्या एक मुलाला - सत्यवानाला - वर म्हणून निवडले. इथेही नारदमुनी आले आणि त्यांनी भविष्यवाणी केली की बरोबर एक वर्षानंतर म्हणजेच सावित्री १२ वर्षाची झाल्यावर सत्यवान मरण पावेल. यानंतर सावित्री उंची दागदागिने, वस्त्रं सोडून वल्कले नेसून वनामध्ये राहू लागली. बरोबर एक वर्ष पूर्ण होण्याअगोदर सावित्रीने तीन दिवस उभे राहून उपास केला. चौथ्या दिवशी सत्यवानाबरोबर ती वनात गेली आणि यम सत्यवानाचे प्राण घ्यायला आला. यमाच्या मागे सावित्री जात राहिली. यमाने तिची चिकाटी पाहून तिला वर मागायला सांगितला. यावर तिने आधी आपल्या पित्याला म्हणजेच अश्वपतीला १०० पुत्र मागितले. त्यानंतर दुसरा वर मागून आपल्या सासऱ्याची दृष्टी आणि गेलेले राज्य परत मिळवले आणि शेवट तिसरा वर मागितला की मला १०० पुत्र दे.. पतीशिवाय पुत्र कसे मिळणार यामुळे यमाने सत्यवानाचे प्राण परत दिले आणि सावित्री त्याच्यासोबत परत आली. अशा रीतीने तिने नवऱ्याचे प्राण वाचवलेच आणि आपलं माहेर आणि सासर दोघांचा उद्धार केला. म्हणून ती आदर्श.

या कहाणीची आणि व्रताची अनेक रुपं आपल्याला देशभर दिसून येतात. स्त्रीची पाळी चालू असेल किंवा ती नुकतीच बाळंत झाली असेल तर तिच्या वतीने ब्राह्मणाने हे व्रत केलेले चालते. तर काही ठिकाणी वडाला पूजल्यानंतर घरी येऊन सासूच्या पाया पडावे अशी रीत आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेचं उदात्तीकरण आणि व्रत वैकल्यांमध्ये स्त्रियांना गुंगवून ठेवून त्यांना या व्यवस्थेच्या पाईक बनवण्याचं काम अशी व्रतं करीत आहेत. आपल्यावरील भेदभाव, अन्याय दूर करण्यासाठी स्त्रियांकडे दुसरी कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे निदान व्रतं, उपास-तापास करून तरी आपलं खरं तर आपल्यापेक्षा आपल्या कुटुंबाचं आयुष्य सुधारेल अशा भाबड्या आशेपायी स्त्रिया ही व्रत-वैकल्यं करत आल्या आहेत. संस्कृतीच्या नावाखाली अशा पुरुषप्रधान रिवाजांचं प्रसारमाध्यमांमधून मोठ्या प्रमाणावर उदात्तीकरण होत आहे. आणि त्यातूनही स्त्रिया अशी व्रतं करू लागल्या आहेत. अगदी घटस्फोट झाल्यानंतरही हाच नवरा सात जन्म मिळू दे म्हणून वडाला फेऱ्या घालणाऱ्या स्त्रिया पहायला मिळतात. शहरामध्ये वडाची झाडं नाहीत म्हणून वडाची फांदी घरी आणून पूजा करण्याची पद्धत पडत आहे. इतका या व्रतांचा पगडा आहे.

या वटपौर्णिमेच्या आधी या व्रताचा अर्थ समजावून घेऊन अशी पुरुषप्रधान संस्कृती जपणारी, आपल्या हातात काही नाही, उपास-तापासातून आपलं भलं होईल ही असहाय्यता वाढवणारी आणि स्त्रीचं अस्तित्व हे तिच्या कुटुंबासाठीच ही मानसिकता जपणारी व्रतं आपण करायची का यावरही निश्चित विचार करू या. तुमच्या प्रतिक्रिया जरूर कळवा. (संदर्भ - सणांचे कूळ उत्सवांचे मूळ-सुमन ओक, साधना प्रकाशन

## आमच्या भागातील होळी

होळीबद्दल वेगवेगळ्या दंतकथा आहेत. माझी आजी होलीकेची गोष्ट सांगायची. चार वर्ण असल्यामुळे एका राजाची मुलगी दलित मुलाशी लग्न करते व माहित झाल्यावर शुद्धीकरण म्हणून स्वतःसह पती-मुलांना जाळून घेते. परंतू ती देवभक्त असल्यामुळे जिवंत राहते वगैरे.

निसर्गात ह्या महिन्यात झाडांची जूनी पाने तुटून पडतात व वसंत ऋतूत नवी पालवी येते. पानझडीमुळे सगळीकडे कचरा होतो तो साफ करण्याकरिता कचऱ्याची होळी केल्या शिवाय मार्ग नसतो. मी मुलांना १९८१ मध्ये ही गोष्ट सांगितली व झाडे तोडण्यास मनाई केली. मित्र मैत्रिणी त्यांना चिडवायची परंतू माझी मुले व विद्यार्थी आपल्या निर्णयावर ठाम राहिले आणि पर्यावरणाची हानी न करता साफ सफाई व होळी या दोन्ही गोष्टी साधता आल्या.

सुमन कोलगंटीवार, राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ, चंद्रपूर

### मराठी विज्ञान परिषदेचा

# पचन संस्थेतील मित्र जीवाणू पोस्टर्स संच


**विज्ञानाचा प्रसार तोही प्रामुख्याने मराठी भाषेतून करणे, विज्ञान शिकण्यासाठी मराठी भाषा समृद्ध करणे, विज्ञानाचे जीवनातले महत्त्व वाढवणे आणि लोकांमध्ये वैज्ञानिक साक्षरता वाढवणे व वैज्ञानिक दृष्टी विकसित करणे या उद्देशांना डोळ्यासमोर ठेवून १९६६ साली मराठी विज्ञान परिषदेची स्थापना झाली. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी परिषद आपल्या विविध विभागांद्वारे नानाविध उपक्रम करीत असते. शहरांमध्ये आणि खेड्यांमध्ये, विद्यार्थ्यांत आणि नागरिकांमध्ये परिषद काम करते. परिषदेतर्फे अंध आणि मूकबधिरांसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.**

**समाजातील सर्व व्यक्तींमध्ये विज्ञानबद्दल जागरुकता आणि जाणीव निर्माण करणे, तसेच त्यांचा सहभाग कामामध्ये मिळवणे अशा रितीने परिषदेची कामे चालतात. परिषदेचे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात मिळून ६६ ठिकाणी विभाग आहेत.**

मराठी विज्ञान परिषदेच्या पुणे विभागाने १५ पोस्टर्सचा एक संच निर्माण केला आहे. पोस्टर्स चा विषय आहे आपल्या पचनसंस्थेतील मित्र जीवाणू. जीवाणू किंवा विषाणू हे बहुतेकवेळा आपल्याला घाबरवणारे किटाणू म्हणूनच माहित असतात. सर्वांचा कल त्यांच्यापासून दूर रहाण्याचा, जंतू ससर्ग टाळण्याकडेच असतो. मात्र कित्येक जीवाणू माणसाचे मित्र असतात ही माहिती खूप कमी जणांना असते. उदा. दुधाचे दह्यात रुपांतर जीवाणूच करतात आणि दह्याच्या रूपाने आपण जीवाणू ही पोटात घेतो ही माहिती सर्वांनाच नसते.

ह्या मित्र जीवाणूंची आणि त्यांच्या उपयुक्ततेची माहिती घेऊन हा संच आपल्या भेटीला येतो. उदा. आपल्या वजनापैकी फक्त जीवाणूंचं वजन जर केलं तर ते तब्बल दोन किलो भरतं. एका वेळी आपल्या शरीरात त्यांची संख्या तब्बल १ दशखर्व म्हणजेच एका वर बारा शून्य इतकी असते. अन्न पचन, जीवनसत्वांची निर्मिती, रोगप्रतिकारक शक्तीमध्ये वाढ, शत्रू जीवाणूंशी मुकाबला अशी किती तरी कामं ते करतात. दूध, दही, फळं, पालेभाज्या, आंबवलेले पदार्थ यातून मुख्यतः जीवाणू आपल्या पोटात जातात. शिवाय सर्वात पहिल्यांदा ते आपल्या पोटात आईच्या दूधातून जातात. कोला, दारू, सोडा, डालडा, मैदा, मिठाया, प्रतिजैविके ह्या गोष्टी जीवाणूंसाठी घातक असतात. अशी खूप भारी आणि उपयुक्त माहिती हे पोस्टर्स सांगतात.




पोस्टर्ससाठी संपर्क करा : मराठी विज्ञान परिषद पुणे विभाग, टिळक स्मारक मंदिर, टिळक रस्ता, पुणे - ४११ ०३०
मोबाईल क्र. ९४२२ ०४८ ९६७
या इमेलवर पत्र पाठवून पोस्टर्सची सॉफ्ट कॉपीही आपल्याला मागवता येईल. mavipa.pune@gmail.com.

पान क्र ४ वरून..

ज्यांनी असा विवाह करण्याचा निर्णय घेतला आहे व जोडीदाराच्या शोधात आहेत

केद्र चालवितांना येणाऱ्या अडचणी : मुख्य प्रश्न अशा जोडप्यांमधील प्रचंड तणावावाखाली असलेल्या मुलींच्या निवासाचा असतो. सरकारनेच अशा निवासाची व्यवस्था करून द्यावी अशी आमची मागणी आहे.

अशा प्रकरणांमध्ये पोलिस मदत करत नाहीत. ते स्वतःच पित्तृसत्ताक जातिआधारित मूल्यांच्या पगड्याखाली असतात.

सध्या सरकार अशा जोडीदारांपैकी एकजण उच्च जातीतील असला तरच आर्थिक लाभ देतं. यामुळे दोघेही जर मागावसर्गीय मात्र वेगळया जातीमधील असतील किंवा आंतर धर्मीय लग्न केलेलं असेल तर शासकीय योजनांचा त्यांना फायदा मिळत नाही.

ज्या जोडप्यांना विशेष विवाह कायदा, १९५४ अंतर्गत एक महिना आधी नोटिस देणे सोयिस्कर वाटत नाही त्यांच्यासाठी हिंदू विवाह कायदा, १९५५ प्रमाणे लग्न करण्याचा पर्याय खुला आहे. परंतू त्यांच्यातील ज्यांना कर्मकांड असलेल्या वैदिक पद्धतीने लग्न करायचे नसते त्यांना नवीन सत्यशोधक पध्दतीने लग्न करण्याचा पर्याय आम्ही दिला आहे. मात्र सत्यशोधक विवाहाच्या नोंदणीची व्यवस्था नसल्यामुळे त्यांना लग्नाची नोंदणी हिंदू विवाह कायदा, १९५५ अंतर्गत करावी लागते. काही कारणाने अशा जोडप्यांनी घटस्फोट इ. साठी कोर्टाकडे धाव घेतली तर मग मात्र तेथे त्यांच्या लग्नाच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते कारण होम किंवा सप्तपदी सारखे विधी त्यांनी केलेले नसतात.

हाच वैधतेचा प्रश्न बौध्द लग्नांबाबत पण निर्माण होतो. १९५६ मध्ये लाखो लोकांनी बौध्द धर्मात प्रवेश केला व नविन बौध्द रीतीप्रमाणे विवाह करू लागले. मात्र अशा पध्दतीने लग्न केलेल्या शंकुतला व निकनाथ या जोडप्याच्या प्रकरणात पोटगीसाठी अर्ज केलेला असताना भंडारा जिल्ह्याच्या प्रथम वर्ग न्यायालयाने व मुंबई उच्च न्यायालयाने हे लग्न अवैध ठरविले. या निर्णयामुळे अशा पध्दतीने झालेले ७०००० विवाह अवैध ठरले.

म्हणूनच विवाहांच्या बाबतीत नविन सुधारणावादी पध्दती शोधून कायदेशीर पातळीवरल नोंदणीची समस्या सोडविण्याची गरज आहे. अशा आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांना समाजाने प्रोत्साहन व संरक्षण देण्याची गरज आहे.

(इंग्रजी लेखाचं संक्षिप्तीकरण आणि मराठी अनुवाद : प्राजक्ता पाठक)

---

**PRINTED MATTER** **बुक पोस्ट**

**प्रकाशक** **प्रति**

**तथापि ट्रस्ट**
रेणुप्रकाश ए, तिसरा मजला
बॅ. गाडगीळ रस्ता, नागनाथ पाराजवळ,
८१७, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरध्वनीः ०२० २४४३११०६/२४४३००५७
Email: tathapi@tathapi.org
Website: www.tathapi.org

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

पारगावच्या पारावरुन चित्रः राजू देशपांडे

**जिव्हाळा देणगी वर्गणी: वार्षिक – रु. ३५, तीन वर्षासाठी – रु. १००** **खाजगी वितरणासाठी**